**जगभर**

# ... सुपातले हसती

**चंद्रशेखर पुरंदरे**

फेब्रुवारीमध्ये इथल्या (इंग्लंडमधल्या) वर्तमानपत्रात एक बातमी आली. एक संपूर्ण फ्रेंच खेडे (वस्तीच, खरेतर) विकण्यासाठी उपलब्ध होते. Credit Agricole नावाच्या फ्रेंच बँकेकडे ही 'मालकी' आहे. आख्खे खेडे साडेचार लाख डॉलर्सला उपलब्ध होते. साडेचार लाख डॉलर्समध्ये लंडनमध्ये दोन बेडरूमचा फ्लॅटसुद्धा मिळत नाही. त्या किमतीत खेड्यातील १९ घरे, पोहण्याचा तलाव, टेनिस कोर्टस्, १३ व्या शतकातील एका चर्चची इमारत आणि एका प्राचीन राजवाड्याचे खंडहर मिळाले असते.

हे खेडे एकेकाळी म्हणजे अगदी ६० च्या दशकापर्यंत संपूर्णपणे शेतीवर अवलंबून होते. त्यानंतर शेतीवर उपजीविका होणे दिवसेंदिवस कठीण होऊ लागल्याने लोक खेडे सोडू लागले. ७०च्या दशकापासून २००८ साली शेवटचा रहिवासी खेडे सोडून जाण्यापर्यंत हा ओघ चालू राहिला. मध्यंतरी एका उद्योजकाने खेड्याच्या पुनरुज्जीवनासाठी त्याचा हॉलिडे रिसॉर्ट करायचा प्रयत्न केला, तोही फसला. गेली काही वर्षे रानझाडे, गुन्हेगार, अंमली पदार्थांचे गुलाम यांच्या ताब्यात खेडे गेले. शेजारच्या गावाच्या सरपंचाच्या शब्दांत एकेकाळी समृद्ध असणाऱ्या या खेड्याची आजची अवकळा अत्यंत क्लेशदायक आहे.

शेतीवर पूर्णत: अवलंबून असणाऱ्या वस्त्या बदलत्या अर्थव्यवस्थेमुळे, नैसर्गिक आपत्तींमुळे देशोधडीला लागणे हा प्रकार आपल्याकडच्या सारखाच जगभर आढळतो.

हे उदाहरण तर संपन्न पश्चिम युरोपमधील एका खेड्याचे झाले. तिथे निदान रहिवाशांना पर्याय तरी उपलब्ध होता. पण अशी गावेच्या गावे, शहरेच्या शहरे जगात अनेक ठिकाणी 'रिकामी' होत आहेत; किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.

इराक-अफगाणिस्तानसारख्या युद्धग्रस्त देशात, सीरियासारख्या यादवीग्रस्त देशात मानवी हिंसाचार हे कारण आहे. आधीच्या सोविएत युनियनमध्ये सत्तेचे अतिकेंद्रीकरण व तदनुषंगिक धोरणे हे कारण होते. अल्पावधीत मिळालेला अनर्ह अतोनात पैसा व त्याची शहर-निर्मितीतील गुंतवणूक हे चीनमधील कारण आहे तर 'दत्तक' घेतलेल्या भूभागावरची बहुराष्ट्रीय कंपन्यांची सत्ता हे फिलिपिन्ससारख्या विकसनशील देशातील कारण आहे.

यातील आधीच्या सोविएत युनियनमधून शिल्लक राहिलेल्या रशियाचे उदाहरण जरा विस्तृतपणे पाहण्यासारखे आहे. स्टॅलिनच्या कारकीर्दीत एकाच उद्योगावर अवलंबून असणारी अनेक शहरे रशियात वसवण्यात आली. या शहरांच्या निर्मितीमागे विकासदृष्टी (अगदी भांडवलशाही चष्म्यातूनही) नव्हती. ना शहरी दूरलक्ष्यी नियोजन ना आगामी नागरिकांच्या गरजेचा खोलवर विचार. स्टॅलिनच्या काळात राजकीय कारणांसाठी विरोधकांना कैदेत टाकण्याची पद्धत होती. त्यामुळे कैद्यांची संख्या देशात प्रचंड होती. अशा व इतर कैद्यांच्या मजुरीवर ही शहरे उभी राहिली. या शहरांमध्ये रहायची जागा, शाळा, हॉस्पिटल, सरकार ज्या करमणुकीला परवानगी देईल ती 'करमणूक', खात्रीची आयुष्यभराची नोकरी व नोकरीनंतर खात्रीचे निवृत्तीवेतन अशा गोष्टींची सोय करण्यात आली. दुसऱ्या शब्दांत, अन्न-वस्त्र-निवारा या प्राथमिक गरजा, शिक्षण, आरोग्य, करमणूक या दुय्यम गरजा पुरवण्यात आल्या. याउपर तक्रार असल्यास दडपशाहीची कायमची टांगती तलवार. यायोगे माणसे मेंढरासारखी वागतील या तत्त्वावर या शहरांची निर्मिती झाली.

जोपर्यंत दमनकारी राज्यव्यवस्था शाबूत होती तोपर्यंत त्याविरुद्ध आवाज उठवणेच शक्य नसल्याने म्हणा किंवा खरोखर अशी परिस्थिती मान्य असल्याने म्हणा, खेळ चालला, नंतर एकदम आभाळच फाटले. सोविएत युनियनचे विघटन झाले. मग खुली अर्थव्यवस्था आणि जागतिक बाजाराचे आगमन (आक्रमणच) झाले.

एका अंदाजानुसार अशी साडेचारशे मोठी शहरे आणि सव्वातीनशे छोटी शहरे आज रशियात आहेत. त्यांची एकत्रित लोकसंख्या अडीच कोटीच्या आसपास आहे. म्हणजे, रशियाच्या एकूण शहरी लोकसंख्येच्या एक पंचमांश ते एक चतुर्थांश लोकसंख्या या शहरवासियांची आहे आणि हे उद्योग तर आता एकामागून एक बंद पडत आहेत. एवढ्या संख्येने लोक - तेही आवाजी शहरवासी - बेकार होणे हे सामाजिक अस्थैर्याला व असंतोषाला मोठेच आमंत्रण आहे. मोठ्या प्रमाणावर अंतर्गत खळबळ चालू झालीच आहे.

तुलनेसाठी उदाहरण द्यायचे झाल्यास आपल्याकडचे भिलाई, रुरकेला, बोकारो, दुर्गापूरचे पोलाद उद्योग किंवा राष्ट्रीय केमिकल्स् व फर्टिलायझर्सचे कारखाने सांगता येतील. त्यांची संपूर्ण वसाहतच - ही शहरेच - त्या त्या कारखान्याच्या यशस्वितेवर अवलंबून आहेत. जोपर्यंत नेहरूदर्शी केंद्रीय समाजवाद आणि नियंत्रित

अर्थव्यवस्था होती तोपर्यंत या कारखान्यांना आणि त्यांच्यावर उपजीविका अवलंबून असणाऱ्या जनतेला उपजीविकेची काळजी नव्हती. पण या कारखान्याचे उत्पादन ज्या क्षणी जागतिक बाजारपेठेत विकणे मुष्किल होईल, त्याक्षणी या शहरांची जीवनव्यवस्था धोक्यात जाईल. ही प्रक्रिया रशियात पाच सहा वर्षांपूर्वी स्पष्ट होऊ लागली. सुरूवात दहा-पंधरा वर्षांपूर्वीपासून, म्हणजे सोविएत युनियनचे विघटन, नंतरचे आर्थिक अराजक, पाशवी भांडवलशाहीचा उदय इत्यादी कारणांनी झाली.

स्टॅलिनच्या काळात खाणकाम, धातू बनवणारे कारखाने, मोटारगाड्या, विविध यंत्रसामुग्री बनवणारे कारखाने वगैरे अनेक प्रकारचे उद्योग त्या-त्या कच्च्या मालाच्या उपलब्धतेच्या प्रदेशात सुरू करण्यात आले होते. नियंत्रित अर्थव्यवस्था कोलमडल्यावर तेथील उत्पादन बाजाराच्या स्पर्धेत टिकाव धरेना. उदाहरणार्थ, दक्षिण कोरियात बनणारी मोटारगाडी रशियात बनवलेल्या मोटारगाडीपेक्षा स्वस्तात मिळत असेल तर त्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान, लवचिकपणा या केंद्रशासित प्रबंधकांकडे नव्हता. कारण तशी वेळच आजवर आलेली नव्हती. कामगारांनाही एकाच प्रकारचे तंत्रज्ञान अवगत होते. त्यावर त्या कारखान्यात आयुष्यभर नियमित वेतनावर नोकरी करायची आणि निवृत्तीचे फायदे घ्यायचे अशीच मनोभूमिका तयार व घट्ट झालेली आहे.

पश्चिम युरोप-अमेरिका-जपान वगैरे भांडवलशाही देशांत ६०-७० च्या दशकांपासूनच बाजाराच्या गतिमानतेत टिकून राहण्यासाठी कामगारांना नवीन तंत्रज्ञान शिकणे व शिकवणे गरजेचे होऊ लागले. औद्योगिक संस्कृतीचा तो अविभाज्य भाग झाला. ती परिस्थिती सुरक्षित सोविएत युनियनमध्ये आली नाही. एक-दोन पिढ्यांपूर्वीपर्यंत आपल्याकडे सरकारी नोकरी, बँक यांच्यात एकदा शिरकाव झाला की निवृत्तीपर्यंतची उपजीविकेची चिंताच मिटली अशी धारणा असे. तोच प्रकार रशियात उद्योगक्षेत्रात होता. खुली अर्थव्यवस्था देशावर येऊन आदळताच आजवरचे स्थैर्य एकदम धोक्यात आले. खुल्या अर्थव्यवस्थेबरोबर - आर्थिक अराजकच, वस्तुत: स्थानिक-प्रादेशिक-राष्ट्रीय स्तरावर एक नवा भांडवलशाही वर्ग झपाट्याने उदयास आला. त्यांनी गुंतवणूक म्हणून हे कारखाने सरकारकडून अतिशय स्वस्तात विकत घेतले. आपल्याकडे बिल्डर्स, उद्योजक जसे त्यांच्या प्रकल्पांसाठी पडेल भावाने, बाजारभावाच्या अंशत:च किंमत देऊन जमिनी 'खरेदी' करतात, तोच प्रकार. त्यावेळी ही गुंतवणूक फायदेशीर ठरेल असा त्यांचा होरा होता. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या स्पर्धेला रशियन उत्पादन तोंड देऊ शकेना हे लक्षात आल्यावर हे कारखाने बंद करणे एवढाच पर्याय राहिला. लाडा (LADA) ही एकेकाळची सोविएत युनियनची अभिमान असणारी मोटारगाडी. ती बनवणारा कारखाना दोन वर्षांपूर्वी अडीच अब्ज डॉलर्स कर्जात बुडाला होता. क्षमतेच्या एक तृतीयांश उत्पादन होत होते. तोल्याती (Tolyatti) नावाचे शहर लाडा कारखान्याभोवती उभे राहिले होते. कारखान्यातील साधारण लाखभर कर्मचारी, कारखान्याला इतर पुरवठा करणारे छोटे उद्योजक या सगळ्यांची कुटुंबे, इतर सेवाक्षेत्रे एकूण त्या प्रदेशाची अर्थव्यवस्थाच कारखाना बुडीत गेल्यावर धोक्यात आली. प्रश्न आर्थिक होताच, त्याहून जास्त सामाजिक होता व आहे. पिकालेवो (Pikalevo) नावाच्या सेंट पीटर्सबर्गजवळच्या दुसऱ्या एका शहरात ॲल्युमिनियम, पोटॅश आणि सिमेंट बनवणारा कारखाना अडीच वर्षांपूर्वी असाच बंद पडला. बावीस हजार कामगार व कारखान्यावर अवलंबून असणारे, म्हणजे, शहरातले सगळेच लोक अक्षरश: रस्त्यावर आले. कोणतीही सरकारी मदत नाही, दुसऱ्या नोकरीची शक्यता नाही, स्थानिक किराणा दुकानदारांनी या लोकांना गेले कित्येक महिने पगार मिळत नाहीत हे पाहून उधारी बंद केलेली, अशा परिस्थितीत लोक खरोखर गवत खाऊ लागले. या अगतिकतेतून त्यानी जवळचा राष्ट्रीय महामार्ग बंद केला. मग अध्यक्ष पुतीन तातडीने तेथे आले. त्यांनी टीव्ही कॅमेऱ्यांसाठी कारखान्याच्या मालकाला जाहीर दम भरला. कारखान्याचा मालक हा रशियातील त्यावेळचा सर्वात श्रीमंत गृहस्थ होता. कामगारांना भरपाई देण्याच्या कागदपत्रांवर त्याला तेथेच सही करायला पुतीनने भाग पाडले. हा राजकीय दिखावा होता. सह्या झालेल्या कागदपत्रातील शर्तींमधून मालकाला पळवाट काढता येईल अशी सोय होती.

रशियातील या प्रश्नाचा आवाका आणि राष्ट्रीय स्थैर्याला असणारा धोका मोठा आहे. अशा उद्योगांचा रशियन औद्योगिक राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ३० ते ४० टक्के मानला जातो. हा हिस्सा कायम राखायचा तर या कामगारांचे पुनर्वसन करावे लागणार. दरम्यान या आर्थिक अराजकाच्या काळात घरांच्या किमतीही वाढल्या आहेत. म्हणजे नव्या ठिकाणी घरे कामगारांना परवडणे शक्यच नाही. सरकारी तिजोरीत एवढा पैसाही नाही आणि राजकीय इच्छाही दिसत नाही. शिवाय इतर कौशल्य, तंत्रज्ञान नसल्याने हे कामगार स्थानबद्ध झाले आहेत. शेतमालाला कमी भाव मिळाला की हवालदिल होणाऱ्या आपल्याकडच्या शेतकऱ्यासारखीच ही परिस्थिती दिसते. संरक्षित अर्थव्यवस्थेत सरकार हा बाजारपेठ व उत्पादक यांच्यातला बफर होता. आता बाजार समोर ठाकल्यावर त्याला सामोरे जाण्याची क्षमताच त्या-त्या क्षेत्रांकडे दिसत नाही. (रशियात उद्योग, आपल्याकडे शेती). सरकारांना व खासगी भांडवलालाही हा तिढा उकलता येईल असे दिसत नाही. त्याचे स्वरूप लेखाच्या शेवटी अधिक विशद केले आहे.

*(पान ३० वर)*

*जगभर (पान ९ वरून)*

दुसऱ्या शब्दांत, जागतिकीकरणाचा हा नवा पैलू पुढे आला आहे. हे उफराटे विकेंद्रीकरण आहे. केंद्रसत्ता तर दुर्बल झाली आहे पण वस्तुत: विकेंद्रीकरणाने समाजातील सगळ्यात दुबळा स्तर सक्षम होणे अपेक्षित असते. त्याऐवजी स्थानिक पातळीवर अनंत सत्ताकेंद्रे निर्माण झाली. रशियात शहरे रिकामी होणे ही बदललेल्या आदर्शवादाची परिणती दिसते तर चीनमध्ये बदललेल्या आदर्शवादाने काही ठिकाणी 'रिकामी' शहरे निर्माण झाली आहेत. शहरी घरांच्या किंमती दिवसेंदिवस वाढतच जाणार, वाढत्या औद्योगिकीकरणाने शहरीकरण झपाट्याने होणार या अपेक्षेने ओर्दोस नावाच्या शहरात प्रचंड रस्ते, रहात्या फ्लॅटस्च्या इमारती बांधण्यात आल्या. त्या रिकाम्या पडून आहेत कारण ग्राहकच नाही. चीनमध्ये केंद्रात एकपक्षाधिकारशाही-लष्करशाही व आर्थिक सत्ता एकवटलेली आहे. तीच युती स्थानिक पातळीवर असल्याने स्थानिक सत्ताधीश अशा दौलताबादी राजधान्या निर्माण करू शकतात.

फिलिपिन्समधले पोलोमोलोक (Polomolok) हे शहर कालच्या रशियाशी जुळते आहे. तेथे आज सुबत्ता दिसते. फिलिपिन्समधील तीस श्रीमंत नगरपालिकांपैकी पोलोमोलोक आहे. त्या शहराची संपूर्ण अर्थव्यवस्था डोल फूडस् (Dole Foods) या अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीवर अवलंबून आहे. हे शहर एका सुपीक खोऱ्यात आहे. ते खोरेच डोलची वसाहत आहे. ही कंपनी तेथे पपई, अननस, मका व इतर पिके काढते. फळांचे काप, रस आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकले जातात, तशीच इतर खाद्य उत्पादने. उद्या डोल तेथून हलली तर पोलोमोलोक 'रिकामे' होईल. फिलिपिन्समध्येच असा प्रकार घडलेला आहे. जवळजवळ १०० वर्षे सुबिक बे (Subik Bay) या ठिकाणी अमेरिकेचा मोठा आरमारी तळ होता. १९९२ ला तो तळ बंद करण्यात आला. तोपर्यंत म्हणजे अनेक पिढ्या हा तळ कायम राहणार हे स्थानिकांचे गृहीत होते. त्या अनुषंगाने तेथील अर्थव्यवस्था निर्माण झाली आणि तगली. तळ हलल्यावर अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था कोलमडली.

एकूण आढावा घेता एक-दोन मुद्दे समोर येतात. रशियात एकाच उद्योगाच्या केंद्राभोवती शहरे वसवली गेली. मानवी गरजा आणि बाजाराचे वर्तन सरकार ठरवेल हे त्यामागचे गृहीत होते. याच्याशी संलग्न मुद्दा म्हणजे वरखाली होणे, अस्थिरता हा मुक्त बाजाराचा गुणधर्म आहे. बहुतांश माणसांना स्थैर्य लागते. मूलभूत आणि दुय्यम गरजा भागवण्यासाठी हे स्थैर्य राज्यव्यवस्थेने द्यावे ही त्यांची अपेक्षा असते. पण राज्यव्यवस्था कशी वागेल यावर त्यांचे अगदी लोकशाहीतही नियंत्रण नसते. ही तिढ्याची एक बाजू झाली.

हे स्थैर्य 'स्वातंत्र्या'च्या मोबदल्यात मिळावे का? कम्युनिझम उलथला जाईपर्यंत रशियात ती परिस्थिती होती. आणीबाणीनंतर प्रा. ग. प्र. प्रधान यांनी 'भाकरी आणि स्वातंत्र्य' अविभाज्य असल्याचे प्रतिपादन केले होते. ते स्थलकालवर्गनिरपेक्ष दिसत नाही. तिसरी बाजू म्हणजे अतिगतिमान आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकाऊ कौशल्य सतत आत्मसात करणे बहुसंख्यांना परवडणारे नाही. (आर्थिकदृष्ट्या, संधीच्या दृष्टीने आणि वर म्हटल्याप्रमाणे 'स्थैर्या'ला बाधा येईल म्हणून) आणि बहुसंख्यांनी ते आत्मसात केले तर ते विकाऊही ठरणार नाही.

वास्तवातील भांडवलशाही 'विकासा'ला त्या आवाक्याचा व्यावहारिक स्थलकालनिरपेक्ष पर्याय दिसत नाही.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

मार्च २०१२ च्या अंकातील जगभर सदरातील शेवटच्या तीन ओळी पुढीलप्रमाणे वाचाव्यात -

... तेथे लोकशाही असल्याने पश्चिमेला गैरसोईची आहे पण सीरिया रशियाच्या पाठिंब्यावर असल्याने लोकशाहीचा गजर सीरियात सोईचा आहे.

*मुद्रणदोषाबद्दल दिलगीर आहोत.*

*- कार्यकारी संपादक*